## प्रकरण IV

# लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय अहवाल पद्धती

# प्रकरण IV:
# लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय अहवाल पद्धती

आर्थिक नियम, कार्यपद्धती आणि निर्देशांचे अनुपालन यावर आधारित एक मजबूत आंतरिक आर्थिक अहवाल प्रणाली तसेच अशा अनुपालनाच्या स्थितीवरील समयोचित दर्जेदार अहवाल हे सुशासनाचे एक वैशिष्ट्य आहे.

हे प्रकरण चालू वर्षात राज्य शासनाच्या विविध विभागांचे वित्तीय नियम, पद्धती आणि निर्देशांच्या अनुपालनाचा संक्षिप्त आढावा आणि स्थिती दर्शविते.

**वित्तीय लेख्यांच्या पूर्णत्वासंबंधी मुद्दे**

## 4.1 राज्याचा संचित निधी किंवा लोक लेख्यांबाहेरचा निधी

भारतीय राजघटनेच्या अनुच्छेद 266(1), अनुच्छेद 267 च्या तरतुदींच्या अधीन राहून प्रदान करते की, राज्य शासनाला मिळालेला सर्व महसूल, राज्य शासनाने कोषागार बिले, कर्ज किंवा अरथोपाय अग्रिम जारी करून उभे केलेले सर्व कर्ज आणि कर्जाच्या परतफेडीने शासनाला मिळालेली सर्व रक्कम मिळून बनलेल्या निधीला 'राज्य शासनाचा संचित निधी' असे संबोधले जाते. अनुच्छेद 266(2) प्रदान करते की राज्य शासनाला किंवा राज्याच्या वतीने मिळालेला सर्व निधी, यथास्थिती राज्याच्या लोक लेख्यात जमा करण्यात येईल.

एका घटनेत जेथे संचित निधीच्या बाहेर निधीच्या निर्मितीद्वारे सार्वजनिक खर्चाची पूर्तता केली गेली, त्याचा उल्लेख नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या पूर्वीच्या राज्य वित्तीय अहवालात[1] करण्यात आला होता. ही पद्धत वर्तमान वर्षात चालू ठेवली आहे.

### 4.1.1 महाराष्ट्र निवारा निधी

गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासनाच्या ठरावाद्वारे (मे 2010) केंद्रीय सहाय्यामार्फत विविध गृहनिर्माण योजना उपक्रमांकरिता शासनाच्या संसाधनांना पूरक होईल हा उद्देश्य ठेऊन महाराष्ट्र निवारा निधीची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्र निवारा निधीला महाराष्ट्र राज्य शासन, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (SRA) मिळविलेल्या 90 टक्के भूमी अधिमूल्यातून निधी प्राप्त होतो. हा निधी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रांतर्गत निर्माण करण्यात आला आणि शासन निर्णयानुसार हा निधी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर लेखापरीक्षित केला जाईल आणि

---

[1] परिच्छेद 1.2.3, परिच्छेद 1.5.2, परिच्छेद 1.2.3 आणि परिच्छेद 4.1.1 भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक ह्यांचे अनुक्रमे वर्ष 2013-14, 2014-15, 2016-17,2019-20 आणि 2020-21 चे राज्य वित्तावरील अहवाल

महाराष्ट्र निवारा निधीचे वार्षिक लेखे आणि लेखापरीक्षा अहवाल प्रत्येक वर्षी राज्य विधीमंडळासमक्ष सादर करण्यात येईल.

ह्या निधीच्या निर्मितीपासून मार्च 2021 पर्यंत महाराष्ट्र निवारा निधीला ₹ 36,982.48 कोटी महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रीय विकास प्राधिकरण आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून आवर्ती अंशदानाद्वारे मिळविलेल्या 90 टक्के भूमी अधिमूल्यातून प्राप्त झाले आहे. 2021-22 पर्यंतचे लेखे तयार केलेले नाहीत (नोव्हेंबर 2022) ह्या निधीतून मार्च 2021 पर्यंत ₹ 6,376.50 कोटी खर्च करूनही महाराष्ट्र निवारा निधीतून केलेल्या जमा आणि खर्चाचे वार्षिक लेखे आणि लेखापरीक्षा अहवाल राज्य विधीमंडळाला सादर करण्यात आले नाहीत (नोव्हेंबर 2022).

हा निधी एक स्वायत्त संस्था महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत निर्माण करण्यात आल्यामुळे आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी (DPC अधिनियम 1971) च्या अंतर्गत अनुच्छेद 20(1) नुसार लेखापरीक्षण केल्यामुळे महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम, 1976 मध्ये महाराष्ट्र निवारा निधीच्या निर्मितीचा समावेश केल्याची एक औपचारिक सुधारणा तसेच नंतर निधीच्या लेखापरीक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र निवारा निधीला प्रशासकीय आणि आर्थिक स्वायतत्ता व ह्या निधीचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून करणे सुनिश्चित करण्यासाठी वित्त विभागाद्वारे (ऑगस्ट 2017) गृहनिर्माण विभागाला महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियम, 1976 मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परंतु महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण अधिनियमात अद्याप सुधारणा करण्यात आली नाही (नोव्हेंबर 2022).

अशाप्रकारे, महाराष्ट्र निवारा निधीची शासनाच्या लेख्याबाहेर निर्मिती आणि संचालनामुळे नियमित अधिकृततेच्या प्रक्रियेद्वारे विधायी पडताळणीतून सूट मिळाली. महाराष्ट्र निवारा निधीच्या अंतर्गत नियोजित उपक्रम नियमित अर्थसंकल्पीय प्रक्रियेनुसारच चालविणे योग्य राहिल.

## 4.2 व्याजासंबंधी जबाबदारी न निभावण्याबद्दल

***व्याज धारक ठेवी***

राज्य शासनाला "व्याजधारक ठेवी लेखे" या शीर्षांतर्गत पडून असलेल्या गुंतवणूक न केलेल्या शिलकीवर व्याज प्रदान करावे लागते. 2021-22 दरम्यान 31 मार्च 2022 पर्यंत व्याजधारक ठेवी लेख्यांमध्ये पडून असलेली ₹ 57,753.44 कोटीची एकूण शिल्लक गुंतवण्यात आली नाही. राज्य शासनाने गुंतवणूक न केलेल्या ₹57,108.56 कोटींच्या भागावर ₹ 2,623.95 कोटी व्याज प्रदान केले. गुंतवणूक न केलेल्या उर्वरित ₹ 644.88

कोटीच्या भागावर व्याज प्रदान करण्यात आले नाही. या गुंतवणूक न केलेल्या भागावर अर्थोपाय अग्रिमा (Ways & means Advances) वर लागू केलेल्या व्याज दरानुसार ₹ 25.79 कोटीचे व्याज दायित्व परिगणित करण्यात आले. व्याज धारक ठेवींवरील व्याजा संबंधातील जबाबदारी निभावण्यात न आल्याबाबतचे विवरण **तक्ता 4.1** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 4.1: व्याजधारक ठेवींवरील व्याजाच्या संदर्भात जबाबदारी न निभावणे**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | व्याजधारक ठेवी | 1 एप्रिल 2021 रोजी सुरुवातीची शिल्लक | गुंतवणूक न केलेला भाग ज्याकरिता व्याज प्रदान करण्यात आले नाही | तरतूद न करण्यात आलेली व्याज रक्कम (4 टक्के दराने परिगणित) |
|---|---|---|---|---|
| 1 | 8336-नागरी ठेवी | 46569.43 | 0 | 0 |
| 2 | 8338-स्थानिक निधी वर ठेवी | 89.04 | 89.04 | 3.56 |
| 3 | 8342-इतर ठेवी | 11094.97 | 555.84 | 22.23 |
| | **एकूण** | **57753.44** | **644.88** | **25.79** |
| स्त्रोतः वित्त लेखे 2021-22 | | | | |

### *व्याज धारक राखीव निधी*

- 2021-22 दरम्यान, राज्य शासनाने राष्ट्रीय पेंशन योजने अंतर्गत नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडला ₹ 3,761.74 कोटी हस्तांरित केले. 31 मार्च 2022 पर्यंत ₹ 9,050.14 कोटी संचयी जमा रक्कम नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडला हस्तांतरित करण्यात आली नाही. हस्तांतरित न केलेल्या ₹ 10,642.26 कोटी (1 एप्रिल 2021 ची शिल्लक) शिलकीवर सामान्य भविष्य निर्वाह निधीच्या दराने (7.1 टक्के) ₹ 755.60 कोटी इतके व्याज दायित्व परिगणित करण्यात आले. त्यापैकी या वर्षादरम्यान नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडला ₹ 271.61 कोटी प्रदान करण्यात आले. प्रदान करण्यात न आलेल्या ₹ 483.99 कोटी व्याजाचा शासनाच्या एकूणच दायित्वावर प्रभाव आहे.
- राज्य पर्यायी वनीकरण निधी (₹ 3,432.72 कोटी) आणि सामान्य विमा निधी (₹ 346.76 कोटी) च्या अंतर्गत पडून असलेल्या शिलकीवर व्याज देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. व्याजाची गणना अर्थोपाय अग्रिम रकमांच्या सरासरीवर चार टक्के व्याज दरानी केली जाते. वर्ष 2021-22 मध्ये राज्य पर्यायी वनीकरण निधी संदर्भात ₹ 137.31 कोटी व्याजाची रक्कम देण्यात आली नाही.

## 4.3 राज्य कार्यान्वयन अभिकरणाला थेट निधी हस्तांतरित

विविध योजना व कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात निधी थेट राज्य कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरित करते. हा निधी राज्य अर्थसंकल्प/राज्य कोषागार यंत्रणेमार्फत वळता होत नसल्याने राज्याच्या वित्तीय लेख्यात हा निधी संकलित

होत नाही आणि काही प्रमाणात राज्य सरकारचे जमा आणि खर्च तसेच त्यापासून उत्पन्न इतर आर्थिक चल/निकष हे संपूर्ण चित्राचे प्रतिनिधित्व करीत नाही.

त्यामुळे, केंद्र शासनाने निर्णय घेतला की, 01 एप्रिल 2014 पासून पुढे केंद्र पुरस्कृत योजनाशी संबंधित/अतिरिक्त केंद्रीय सहाय्याशी संबंधित संपूर्ण सहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना न देता थेट राज्य शासनाला हस्तांतरित करण्यात येईल.

2021-22 दरम्यान, ₹ 14,793.46 कोटींचा केंद्रीय निधी राज्य शासनाच्या मार्फत देण्याऐवजी थेट राज्य कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरित केला गेला. हे संबंधित योजनेच्या योजना मार्गदर्शक तत्वांनुसार होते.

वित्तीय लेख्यांच्या खंड II मधील परिशिष्ट VI मध्ये हे हस्तांतरण दर्शविण्यात आलेले आहे. मागील पाच वर्षादरम्यान राज्य कार्यान्वयन अभिकरणांना केलेल्या थेट हस्तांतरणाचा वाढता कल **तक्ता 4.2** मध्ये तपशीलवार दर्शविला आहे.

**तक्ता 4.2 : 2017-18 ते 2021-22 दरम्यान थेट कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरित निधी**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| राज्य कार्यान्वयन अभिकरणांना थेट हस्तांतरण | 1854.82 | 3004.46 | 7851.42 | 12599.90 | 14793.46 |
| स्रोतः संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे | | | | | |

वर्ष 2021-22 दरम्यान कार्यान्वयन अभिकरणांना प्राप्त झालेले मुख्य हस्तांतरण **तक्ता 4.3** मध्ये दर्शविलेले आहेत.

**तक्ता 4.3 :कार्यान्वयन अभिकरण ज्यांना भारत सरकारकडून थेट हस्तांतरण**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | भारत सरकारच्या योजनेचे नाव | कार्यान्वयन अभिकरणाचे नाव | 2021-22 दरम्यान सरकारद्वारा मुक्त |
|---|---|---|---|
| 1 | प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) 3624 | कृषी विभाग, महाराष्ट्र | 6484.60 |
| 2 | विकेंद्रीत खरेदी हमी योजनेला खाद्य अनुदान- राज्य घटक (9219) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग - महाराष्ट्र शासन | 4082.07 |
| 3 | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रम- राज्य घटक [9219] | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी संस्था महाराष्ट्र (राज्य घटक) | 2678.21 |
| 4 | आंतरराज्यीय अन्नधान्य चळवळीला सहाय्य आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम अंतर्गत FPS व्यावसायिकांची सीमा [3424] | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग - महाराष्ट्र शासन | 289.72 |
| 5 | सागरमाला (9826) | महाराष्ट्र सागर विकास मंडळ | 172.88 |
| 6 | खासदार, स्थानीय क्षेत्र विकास योजना [1261] | जिल्हाधिकारी, महाराष्ट्र | 144.00 |

| अनु क्र. | भारत सरकारच्या योजनेचे नाव | कार्यान्वयन अभिकरणाचे नाव | 2021-22 दरम्यान सरकारद्वारा मुक्त |
|---|---|---|---|
| 7 | राष्ट्रीय AIDS आणि STD नियंत्रण कार्यक्रम (9316) | महाराष्ट्र AIDS नियंत्रण मंडळ | 132.74 |
| 8 | शोध, तंत्रज्ञान विकास आणि वापर [1819] | शैक्षणिक विद्यापीठे | 126.66 |
| 9 | भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण [0845] | जमीन अधिग्रहण सक्षम प्राधिकारी | 124.42 |
| 10 | भारतात (हायब्रीड आणि विद्युत वाहनांचा जलद अंगीकार आणि निर्मितीची योजना [3382] | बृहनमुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | 72.92 |
| 11 | जैवतंत्रज्ञान संशोधन व विकास [0150] | शैक्षणिक विद्यापीठे | 65.62 |
| 12 | PDS च्या अंतर्गत देय साखर अनुदान [3043] | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग - महाराष्ट्र शासन | 60.44 |
| 13 | सौर उर्जा– ग्रीड परस्परसंवादी [3321] | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित | 59.71 |
| 14 | विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थान आणि मानव क्षमता विकास [1817] | शैक्षणिक विद्यापीठे | 59.47 |
| 15 | अटल भूजल योजना [3282] | अटल जल–राज्य प्रकल्प एकक, महाराष्ट्र | 43.18 |
| 16 | अनुसंधान, प्रशिक्षण आणि अभ्यास आणि इतर रस्ता सुरक्षा योजना [0848] | वाहतूक आयुक्त कार्यालय | 35.28 |

स्त्रोतः वित्त लेखे 2021-22; सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली –PFMS

## 4.4 Single Nodal Agency (SNA) आणि Single Nodal Account

अधिक प्रभावी रोख व्यवस्थापन आणि सार्वजनिक खर्चामध्ये अधिक कार्यक्षमता आणण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातील व्यय विभागाच्या कार्यालय ज्ञापनाद्वारे (मार्च 2021), जे 01 जुलै 2021 पासून प्रभावी झाले, केंद्र पुरस्कृत योजनेसाठी (CSS) निधी जारी करणे आणि निधीच्या देखरेखीसाठी व वापरासाठी सविस्तर कार्यपद्धती जारी केली.

मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक राज्य शासनाला केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी एक Single Nodal Agency (SNA) नियुक्त करावयाची आहे. SNA राज्य पातळीवर राज्य शासनाद्वारे सरकारी व्यवहार करण्यासाठी प्राधिकृत अधिसूचित वाणिज्यीय बँकेत प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेसाठी खाते उघडेल. मंत्रालये/विभाग प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेचा केंद्रिय हिस्सा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मध्ये असलेल्या राज्य शासनाच्या खात्यात जमा करेल व पुढे तो SNA च्या खात्यामध्ये जमा करेल.

संपुर्ण अखर्चित रक्कम सर्व कार्यान्वयीन अभिकरणांकडून SNA च्या खात्यात परत केली जाईल हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासनाची असेल.

वित्त मंत्रालय, भारत सरकारच्या निर्देशांनुसार, CSS अंतर्गत राज्य सरकारकडून प्राप्त होणारा निधी राज्य शासनाद्वारे वापरण्यासाठी प्रतिबंधित आहे आणि तो प्राप्त झाल्यापासून 21 दिवसांच्या आत संबंधित SNA च्या खात्यात हस्तांतरित करणे आवश्यक होते. भारत सरकारच्या मेमोरँडमच्या अनुषंगाने, GoM ने SNA च्या जलद अंमलबजावणीसाठी प्रशासकीय विभागांना वेळेसह जबाबदाऱ्यांचे वाटप करणारे परिपत्रक (जुलै 2021) जारी केले.

वित्त विभागाने राज्यात लागू केलेल्या सर्व CSS साठी SNA नियुक्तीबाबत एकत्रित माहिती (जानेवारी 2023) सादर केली नाही. वित्त विभागाने (नोव्हेंबर 2022) प्रशासकीय विभागांना संबंधित विभागांद्वारे लागू केलेल्या CSS साठी लेखा यंत्रणा आणि SNA ची नियुक्ती देण्याचे निर्देश दिले. राज्य आरोग्य अभियान, सार्वजनिक आरोग्य विभाग (डिसेंबर 2022) कडून मिळालेल्या माहितीनुसार, तीनही CSS (राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय आयुष मिशन, प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान (PM-ABIM)) साठी SNA ची नियुक्ती करण्यात आली आहे आणि या SNA ने मार्गदर्शक तत्वांनुसार अनुसूचित बँकांमध्ये SNA खाती उघडली आहेत. त्याचप्रमाणे, इतर मागास बहुजन कल्याण विभागात (नोव्हेंबर 2022), विभागाने दोन CSS लागू केले आहेत, आणि SNA नियुक्त केले आहेत आणि SNA खाते 2022 पासून कार्यरत आहे. इतर प्रशासकीय विभागांनी अद्याप माहिती देणे बाकी आहे.

31 मार्च 2022 रोजी राज्य शासनाने SNA खात्यामध्ये असलेली अखर्चित रक्कम उपलब्ध करून दिली नाही (जानेवारी-2023).

**पारदर्शिकतेशी संबंधित मुद्दे**

## 4.5 उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात विलंब

मुंबई वित्तीय नियम, 1959 प्रदान करते की, वर्षादरम्यान एका विशिष्ट कारणासाठी मिळालेल्या अनुदानाकरिता, अनुदान घेणाऱ्या संस्थेकडून विभागीय अधिकाऱ्याने उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावयास पाहिजे आणि पडताळणी केल्यावर ते प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)–I, मुंबई, महालेखाकार (लेखा व हकदारी)–II, नागपूर चे संबंधित लेखा अधिकारी आणि वेतन आणि लेखा कार्यालय, मुंबईला जोपर्यंत अन्यथा स्पष्ट केले नसेल, ते मंजुरीच्या दिनांकापासून 12 महिन्याच्या आत सादर करण्यात यावे.

30 जून 2022 रोजी ₹ 37,931.83 कोटी प्रदान केलेल्या राज्य शासनाच्या 27 विभागांकडून 15,057 उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले नव्हते. उपयोगिता प्रमाणपत्र काल-निहाय विलंबाने सादरीकरणाचा तपशील आणि स्थिती अनुक्रमे **तक्ता 4.4** आणि **तक्ता 4.5** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.4: काल निहाय शिल्लक उपयोगिता प्रमाणपत्रांची सद्यस्थिती**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | सुरूवातीची शिल्लक | | निपटान | | सादरीकरणास देय | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या | रक्कम | उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या | रक्कम | उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या | रक्कम |
| 2019-20 पर्यन्त | 12287 | 24148.00 | 6339 | 7770.47 | 5948 | 16377.53 |
| 2020-21 | 15953 | 18713.97 | 12116 | 12438.02 | 3837 | 6275.95 |
| 2021-22 | 31736# | 78385.00# | 26464 | 63106.65 | 5272 | 15278.35 |
| **एकूण** | **59976** | **121246.97** | **44919** | **83315.14** | **15057** | **37931.83** |

#वर्षभरात झालेली वाढ -2020-21 मध्ये काढलेली आणि 2021-22 मध्ये देय असलेली सहाय्य अनुदानाची देयके

स्त्रोतः प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाद्वारे माहिती संकलित केली आहे

**तक्ता 4.5: वर्ष निहाय प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे**


**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या | रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 2013 पर्यंत | 1024 | 6533.98 | 17.23 |
| 2013-14 | 50 | 324.27 | 0.85 |
| 2014-15 | 38 | 445.17 | 1.17 |
| 2015-16 | 238 | 439.77 | 1.16 |
| 2016-17 | 612 | 808.24 | 2.13 |
| 2017-18 | 1513 | 3689.75 | 9.73 |
| 2018-19 | 2473 | 4136.35 | 10.90 |
| 2019-20 | 3837 | 6275.95 | 16.55 |
| 2020-21 | 5272 | 15278.35 | 40.28 |
| **एकूण** | **15057** | **37931.83** | **100** |

स्त्रोतः प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)–I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाद्वारे माहिती संकलित केली आहे

वरील प्रकरणात उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे, दिलेल्या एकूण अनुदानाची उपयोगिता निश्चित करता येऊ शकली नाही. उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित असतांना देखील, संस्थांना अनुदान वितरित करण्यात आले, जे अनुदान मंजुरीवर नियंत्रणाचा अभाव दर्शविते. म्हणून, शासनाने पुढील अनुदान वितरित करण्यापूर्वी एक वर्षावरील प्रलंबित अशा सगळ्या उपयोगिता प्रमाणपत्राचे पुनर्विलोकन करावे.

**आलेख 4.1: प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र** **(₹ कोटी मध्ये)**




(स्त्रोतः 2021-22 चे वित्त लेखे)

**आलेख 4.1** असे दर्शवितो की उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न करण्याची बहुसंख्य प्रकरणे शहरी विकास विभाग (35.97 टक्के), शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग (20.43 टक्के) आणि नियोजन विभाग (12.45 टक्के) शी संबंधित आहेत. उपयोगिता प्रमाणपत्रांच्या सादरीकरणात प्रलंबितता हे केवळ उद्दिष्ट उद्देशांसाठी वितरित अनुदानाच्या वापरावरील आश्वासनाची अनुपस्थिती दर्शवत नाही तर विभागांद्वारे अनुदानितांना जारी केलेल्या अनुदानाच्या वापरावर देखरेखीचा अभाव देखील दर्शविते. **परिशिष्ट 4.1** मध्ये विभाग-निहाय प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांची प्रलंबितता स्वतंत्रपणे प्रत्येक वर्ष निहाय तपशीलवार दर्शविली आहे.

उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न करणे गैरवापराच्या धोक्याने परिपूर्ण आहे, राज्य सरकारने या पैलूवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. पुढे, उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात विलंब झाल्यास केंद्र शासनाद्वारे अनुदानाच्या पुढील वितरणावर परिणाम होईल.

### 4.5.1 अनुदानित संस्थेचे "इतर" म्हणून नोंद घेणे

सहाय्य अनुदान हे एका शासकीय संस्था/संस्था/व्यक्ती द्वारे दुसऱ्या शासकीय संस्था/संस्था/ व्यक्तीला दिलेले सहाय्य, देणगी किंवा योगदान स्वरूपाची देयके असतात.

वित्त लेखे 2021-22 अनुसार सहाय्य अनुदान (₹ 1,52,336.85 कोटी) राज्य शासनाच्या एकूण खर्चाच्या (₹ 3,98,792.31 कोटी) 38.20 टक्के आहे. एकूण सहाय्य अनुदान ₹ 1,52,336.85 कोटी पैकी ₹ 36,890.12 कोटी (24 टक्के) अनुदानित संस्थाना वाटण्यात आले ज्या 'इतर' म्हणून वर्गीकृत करण्यात आले होते.

अनुदान घेणाऱ्या संस्थांच्या योग्य नोंदींच्या अभावी वित्तीय अहवालाच्या पारदर्शकतेवर एक नकारात्मक प्रभाव पडतो.

## 4.6 संक्षिप्त आकस्मिक देयक

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या तरतुदी अन्वये, जेव्हा पैश्यांची आगाऊ मागणी असते किंवा नेमकी किती रकमेची आवश्यकता आहे हे आहरण आणि संवितरण अधिकारी ठरवू शकत नाही त्यावेळी आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांना संबंधित सेवा शीर्षांतर्गत संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे रक्कम काढण्याचे प्राधिकार दिले आहेत. अशा प्रकारे, काढलेल्या रक्कमेच्या अंतिम खर्चाच्या समर्थनार्थ वाऊचर समाविष्ट असलेली तपशीलवार आकस्मिक देयके, 30 दिवसाच्या आत महालेखाकार (लेखा व हकदारी)-मुंबई/नागपूर आणि वेतन व लेखा कार्यालय, मुंबई जे लागू असेल, त्यांना सादर करावे. तसेच वित्तीय वर्षाच्या समाप्तीला संक्षिप्त आकस्मिक देयकावर पैसे काढण्यास वित्त विभागाने (सप्टेंबर 2003) मनाई केली आहे.

30 जून 2022 पर्यंत महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई, महालेखाकार (लेखा व हकदारी)-II, महाराष्ट्र, नागपूर आणि वेतन व लेखा कार्यालय, मुंबई ह्यांना ₹ 4,316.50 कोटींची 1901 तपशीलवार आकस्मिक देयके प्राप्त झाली नव्हती.

असे आढळून आले की, 2021-22 मध्ये 1330 संक्षिप्त आकस्मिक देयकांद्वारे काढण्यात आलेल्या, ₹ 1,222.31 कोटी पैकी 511 संक्षिप्त आकस्मिक देयकांद्वारे (76 टक्के) ₹ 929.02 कोटी मार्च 2022 मध्ये काढण्यात आले होते. मार्चमध्ये संक्षिप्त आकस्मिक देयकावर लक्षणीय आहरण दर्शविते की आहरण प्रामुख्याने अर्थसंकल्पीय तरतूद संपविण्यासाठी होते व अपूरे अर्थसंकल्पीय नियंत्रण उघडकीस आणते. विभाग निहाय तपशीलवार आकस्मिक देयकांची प्रलंबितावस्था **परिशिष्ट 4.2** मध्ये दिली आहे. वर्ष-निहाय प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयकांचा तपशील **तक्ता 4.6** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 4.6: संक्षिप्त आकस्मिक देयकांनुसार तपशीलवार आकस्मिक देयके सादर करण्याची वर्ष-निहायप्रगती**


**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | काढलेली संक्षिप्त आकस्मिक देयके | | तपशीलवार आकस्मिक देयके प्राप्त | | 30 जून 2022 रोजी प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| 2019-20 पर्यंत | 1473 | 2034.41 | 480 | 155.23 | 993 | 1879.18 |
| 2020-21 | 773 | 1392.64 | 471 | 123.97 | 302 | 1268.67 |
| 2021-22 | 1330# | 1222.31# | 724 | 53.66 | 606 | 1168.65 |
| **एकूण** | **3576** | **4649.36** | **1675** | **332.86** | **1901** | **4316.50** |

#वर्षातील जमा

स्त्रोत:प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाने माहिती संकलित केली.

पाच प्रमुख विभागांच्या प्रलंबित तपशीलवार आकस्मिक बिलांची सद्यस्थिती **आलेख 4.2** मध्ये दिली आहे.




(स्त्रोत: वित्त लेखे 2021-22)

**आलेख 4.2** दर्शवितो की 56.02 टक्के प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके (₹ 2418.19 कोटी) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाशी संबंधित आहेत आणि 27.60 टक्के (₹ 1191.32 कोटी) सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित आहेत.

संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे काढलेला निधी राज्याच्या संचित निधीमधील कार्यात्मक मुख्य शीर्षामध्ये वर्ग केला जातो. आकस्मिक देयकाद्वारे लेखे दिलेल्या वेळेत खाती निकाली न काढल्यास, खर्च त्या प्रमाणात वाढतो. तपशीलवार आकस्मिक देयकांचे सादरीकरण न करणे हे विभागाचा तसेच कोषागाराचा देखरेख अभाव दर्शविते.

**हाफकिन बायो फार्मास्युटिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (Haffkine Bio Pharmaceuticals Corporation Limited (HBPCL) ) च्या नावे संक्षिप्त आकस्मिक देयकांचे आहरण**

सरकारी विभाग, स्थानिक संस्था इत्यादी करीता लागणाऱ्या औषधी, वैद्यकीय उपकरणे इत्यादींची खरेदी HBPCL मध्ये स्थापित खरेदी कक्षाद्वारे करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आदेश जारी केले (जुलै 2017). HBPCL च्या खरेदी कक्षाला संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे अग्रिम म्हणून निधी देण्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, संचालके आणि त्या विभागांचे विभाग प्रमुख यांना वित्तीय अधिकार देण्यात आले (मार्च 2018).

त्यानुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी ₹ 4,298.05 कोटी रकमेचा निधी संक्षिप्त आकस्मिक देयकावर आहरण केला आणि HBPCL च्या खरेदी कक्षाला 2017-18 ते 2021-22 अवधीत **तक्ता 4.7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे हस्तांतरित केला.

**तक्ता 4.7: HBPCL च्या नावे काढलेली संक्षिप्त आकस्मिक देयके**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | आहरण व संवितरण अधिकाऱ्याद्वारे हाफकिन बायो फार्मास्युटिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडला संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे हस्तांतरित निधी | 30 जून 2022 रोजी प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके |
|---|---|---|
| 2017-18 | 483.94 | 219.43 |
| 2018-19 | 794.31 | 425.33 |
| 2019-20 | 824.70 | 703.26 |
| 2020-21 | 1650.32 | 1200.57 |
| 2021-22 | 544.78 | 1057.62 |

महाराष्ट्र कोषागार अधिनियम 1968 च्या नियम 303 आणि वित्त विभागाच्या शासन निर्णयात (सप्टेंबर 2003) असे नमूद केले आहे की संक्षिप्त आकस्मिक देयकाच्या आहरणाच्या एक महिन्याच्या आत तपशीलवार आकस्मिक देयक सादर केले पाहीजे. वित्त विभागाच्या निर्णयानुसार (फेब्रुवारी 2008) सक्षम अधिकाऱ्याद्वारे अनुमोदीत विशेष मामल्यामध्ये सादरीकरणासाठी तीन महिने कालावधीची परवानगी असते. तपशीलवार आकस्मिक देयक सादर करण्यासाठीच्या निर्धारित कालावधीपेक्षा खरेदीच्या प्रक्रियेला अधिक कालावधी लागतो म्हणून संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे निधीचे आहरण करणे हे महाराष्ट्र कोषागार अधिनियमाच्या प्रावधानाच्या विसंगत आहे आणि त्यामुळे फार मोठा निधी सरकारी खात्याचा बाहेर असतो.

पुढे, महाराष्ट्र कोषागार अधिनियम 1968 चा नियम 282(2), मागण्यांच्या अपेक्षेने किंवा बजेट अनुदान व्यपगत होईल म्हणून सरकारी खात्यातून रक्कम काढण्यास प्रतिबंध करतो. वित्त विभागाचा ठराव (सप्टेंबर 2003), असे नमूद करतो की वित्त वर्षाच्या मार्च महिन्यामध्ये संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे आहरण करू शकत नाही. परंतु सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग आणि नियोजन विभागाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्याद्वारे 2017-18 ते 2021-22 मध्ये HBPCL ला देण्याच्या उद्देशाने/निधी हस्तांतरित करण्यास काढलेल्या संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की संक्षिप्त आकस्मिक देयकांचा अधिकांश भाग मार्च महिन्यामध्ये नेहमीच काढला गेला आहे. **तक्ता 4.7** असे दर्शवितो की ह्या विभागांच्या अर्थसंकल्पीय अनुदानांतर्गत रक्कम, जी साधारणपणे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या 31 मार्च मध्ये व्यपगत झाली असती ती सरकारी खात्याच्या बाहेर नेली आणि बऱ्याच जास्त अवधीसाठी विनावितरित ठेवले जात होते.

30 जून 2022 रोजी ₹ 4,316.50 कोटींची एकूण संक्षिप्त आकस्मिक देयके, तपशीलवार आकस्मिक देयकाच्या प्रतिक्षेत प्रलंबित आहे त्यापैकी ₹ 3,763.61 कोटी (87 टक्के) सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग व नियोजन विभागाच्या आहरण व संनियंत्रण अधिकाऱ्याद्वारे HBPCL साठी काढलेल्या संक्षिप्त

आकस्मिक देयकांच्या संदर्भात आहे. मागील लेखापरीक्षणात[2] स्पष्टपणे निदर्शनास आणल्यावर सुद्धा अशा प्रमाणात संक्षिप्त आकस्मिक देयके प्रलंबित राहणे सुरू आहे यासाठी राज्य शासनाच्या वतीने प्रलंबन शीघ्र निपटान करण्याकरीता प्रयत्नांची गरज आहे.

दीर्घ कालावधीसाठी अग्रिमचे समायोजन न केल्याने निधीचा गैरवापर होण्याचा धोका असतो आणि त्यामुळे तपशीलवार आकस्मिक देयक वेळेवर सादर करणे सुनिश्चित करण्यासाठी संबंधित आहरण आणि संवितरण अधिकाऱ्याने बारकाईने निरीक्षण करणे आवश्यक आहे.

## 4.7 वैयक्तिक ठेवी लेखे

वैयक्तिक ठेवी लेखे, जे स्वीय प्रपंजी लेखे म्हणूनही ओळखले जातात, ते कोषागारात बँकिंग लेख्यांच्या स्वरूपात ठेवले जातात. महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 494 आणि मुंबई वित्त नियम, 1959 च्या नियम 12 अन्वये वैयक्तिक ठेवी लेखे व स्वीय प्रपंजी लेखे कोषागार अधिकाऱ्याकडे विशिष्ट उद्दिष्टासाठी शासनाच्या शिफारशीने महालेखाकारांच्या सल्ल्याने उघडले जाऊ शकतात.

तसेच महाराष्ट्र कोषागार नियमाच्या नियम 495 नुसार महाराष्ट्र शासनाला संचित निधीतून निधीचे हस्तांतरण करून विशिष्ट प्रयोजनाकरिता आवश्यक असलेला निधी वैयक्तिक ठेवी लेख्यांमध्ये ठेवण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. वैयक्तिक ठेवी लेखे जे एक वर्षापेक्षा जास्त काळ अकार्यान्वित होते ते बंद करून त्यातील अखर्चित शिल्लक एकतर वैयक्तिक ठेवी लेखा धारकाला देण्यात यावी किंवा राज्याच्या संचित निधीत जमा करण्यात यावी. काही प्रकरणात, ज्यात वैयक्तिक ठेवी लेखे संचित निधीच्या नावे केले होते, ते सर्व वर्षा अखेरीस बंद करून संचित निधीमध्ये उणे नावे करून शिल्लक संबंधित सेवा शीर्षात टाकावी.

31 मार्च 2022 रोजी **तक्ता 4.8** मध्ये दर्शविल्यानुसार 1652 वैयक्तिक ठेवी लेख्यात ₹ 10,522.67 कोटींची अखेरची शिल्लक होती.

**तक्ता 4.8: वर्ष 2021-22 दरम्यान वैयक्तिक ठेवी लेख्यांची सद्यस्थिती**

**(₹ कोटी मध्ये)**

| सुरूवातीची शिल्लक | | वर्षादरम्यान जमा | | वर्षादरम्यान बंद केलेले | | अखेरची शिल्लक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| 1975 | 10805.82 | 2 | 21065.32 | 325 | 21348.47 | 1652 | 10522.67 |
| स्त्रोत: वित्त लेखे 2021-22 | | | | | | | |

[2] 31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा राज्य वित्त लेखापरीक्षा अहवाल

वैयक्तिक ठेवी लेख्यात निधी राखून ठेवल्याने केवळ सेवा शीर्षाच्या अंतर्गत नोंद केलेला खर्च वास्तविक खर्चाशिवाय फुगवला जातो असे नाही, तर वास्तविक खर्चावरील कोषागाराचे नियंत्रण देखील सौम्य होते.

2021-22 दरम्यान ₹ 21,065.32 कोटी रक्कम संचित निधीमधून राज्य वैयक्तिक ठेवी लेख्यात हस्तांतरित करण्यात आली. यामध्ये मार्च 2022 मध्ये हस्तांतरित केलेल्या ₹ 647.56 कोटी पैकी ₹ 296.88 कोटी मार्च 2022 च्या शेवटच्या कामाच्या दिवशी हस्तांतरित केले.

31 मार्च 2022 ला शिल्लक असलेल्या ₹ 10,552.67 कोटी पैकी 383 ऑपरेटर संबंधित ₹ 144.40 कोटी रक्कम एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीली. 2021-22 दरम्यान 1652 लेख्यांपैकी फक्त 99 वैयक्तिक ठेवी लेख्यांच्या संदर्भात, प्रशासनाने प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महालेखाकार (लेखा व हकदारी)-II, आणि वेतन व लेखा कार्यालयाशी शिलकी समायोजित केल्या होत्या. अपूर्ण समायोजित शिलकीच्या अचूकतेवर वैयक्तिक ठेवी लेख्यांच्या समायोजित न केलेल्या शिलकीमुळे परिणाम होईल.

### 4.7.1 अप्रवर्ती वैयक्तिक ठेवी लेखे

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 चे नियम 495 व महाराष्ट्र कोषागार नियमावलीचे नियम 585(2) अनुसार वैयक्तिक ठेवी/स्वीय प्रपंजी लेखे एका वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अप्रवर्ती आहे त्यांना बंद करून त्या लेख्यांमधील शिल्लक इतर महसूल म्हणून शासन लेख्याच्या मुख्य शीर्ष 0075 मध्ये जमा करण्यात यावी.

असे निदर्शनास आले की 383 लेख्यांमध्ये एक वर्ष आणि जास्त कालावधीसाठी स्वीय प्रपंजी लेखे प्रशासनाकडून अप्रवर्ती होते, त्यामुळे ₹ 144.40 कोटीचा न वापरलेला निधी स्वीय प्रपंजी लेख्यात मार्च 2022 पर्यंत निष्क्रिय पडून होता. प्रशासनाकडून या बाबतीत विश्लेषण आणि विधिवत शिलकीचे समायोजन करून लेखे बंद करणे आणि अखर्चित शिल्लक राज्याच्या संचित निधीमध्ये परत जमा करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

वैयक्तिक ठेवी लेखयांमध्ये पडलेले आखर्चित शिलकी राज्याच्या संचित निधी मध्ये हस्तांतरित न केल्यामुळे सार्वजनिक निधीचे दुर्विनियोजन होण्याचा धोका असतो.

## 4.8 गौण शीर्ष-800 चा अव्यवहार्य उपयोग

इतर प्राप्ती/इतर खर्चाशी संबंधित सर्व समावेशक गौण शीर्ष 800 योग्य गौण शीर्ष उद्धृत केले नसेल अशाच प्रकरणात उपयोगात आणायचे असते. गौण शीर्ष 800 अंतर्गत तारतम्यहीन जमा आणि खर्चाच्या नोंदी लेख्यांमध्ये अपारदर्शकता आणतात.

मुख्य शीर्षामध्ये योग्य गौण शीर्ष उपलब्ध असतानाही, खर्च गौण शीर्ष-800 च्या नामे केल्याची काही उदाहरणे खाली विस्तृतपणे दिली आहे.

(i) रस्ते कामांशी संबंधित दोन उदाहरणांमध्ये, गौण आणि मुख्य शीर्षाच्या सूचीमधील मुख्य शीर्ष 3054 अंतर्गत उचित शीर्ष 337-रस्ता कामे उपलब्ध असतांनाही राज्य शासनाने ₹ 547.59 कोटीचा खर्च गौण शीर्ष 800 च्या नामे केला.


(ii) ग्रामीण विकास योजनेसाठी जिल्हा परिषदेला दिलेल्या ₹ 1341.68 कोटीच्या सहाय्य अनुदानाचा खर्च मुख्य शीर्ष-2215 अंतर्गत गौण शीर्ष-101 स्वायत्त संस्थाच्या ऐवजी गौण शीर्ष-800 च्या नामे केला.

(iii) समाज कल्याण संस्थांना दिलेले ₹ 132.72 कोटीचे अनुदान मुख्य शीर्ष 2235 अंतर्गत गौण शीर्ष 101 स्वायत्त संस्थांना सहायताच्या ऐवजी गौण शीर्ष-800 च्या नामे केला.

2021-22 मध्ये राज्य शासनाने ₹14,554.70 कोटीचा खर्च 49 महसुली आणि भांडवली मुख्य लेखा शीर्ष अंतर्गत गौण शीर्ष-800 च्या नामे केला जो एकूण महसुली आणि भांडवली खर्च (₹ 3,98,792.31 कोटी) च्या 3.65 टक्के आहे.

**आलेख 4.3** मध्ये वर्ष 2017-18 ते 2021-22 दरम्यान एकूण खर्चाची टक्केवारी म्हणून गौण शीर्ष 800–इतर खर्चाच्या प्रवर्तनाची व्याप्ती दर्शविली आहे.

**आलेख 4.3: 2017-18 ते 2021-22 दरम्यान गौण शीर्ष 800-इतर खर्चाचे प्रवर्तन**




(स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

**आलेख 4.3** 2017-18 ते 2021-22 मध्ये गौण शीर्ष 800 ईतर खर्चाच्या प्रक्रियेमध्ये घट होत असल्याने एकूण महसुली व भांडवली खर्चाच्या हिश्श्यात 7.43 टक्के आणि 3.65 टक्क्या दर म्यान दर्शवते. दिलेल्या मुख्य शीर्षांतर्गत लक्षणीय प्रमाणात (50 टक्के व अधिक) खर्च गौण शीर्ष-800 इतर खर्चामध्ये वर्गीकृत केल्याची उदाहरणे **तक्ता 4.9** मध्ये दिलेली आहेत.

**तक्ता 4.9: 2021-22 दरम्यान गौण शीर्ष 800 – इतर खर्चाच्या अंतर्गत नोंद करण्यात आलेले महत्वपूर्ण खर्च**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | मुख्य शीर्ष | विवरण | गौण शीर्ष 800 अंतर्गत खर्च | एकूण खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2216 | गृहनिर्माण | 801.22 | 1568.15 | 51 |
| 2 | 4055 | पोलिसांवर भांडवली परिव्यय | 162.01 | 291.90 | 56 |
| 3 | 4070 | इतर प्रशासनिक सेवांवर भांडवली परिव्यय | 968.24 | 1002.75 | 97 |
| स्त्रोत:वित्तीय लेखे 2021-22 | | | | | |

वर्ष 2021-22 मध्ये राज्य शासनाने 63 मुख्य शीर्षांशी संबंधित एकूण महसुली जमा (₹ 3,34,490.45 कोटी) पैकी 3.25 टक्के म्हणजे ₹ 10,855.07 कोटी गौण शीर्ष "800-इतर जमा" मध्ये वर्गीकृत केले. मागील वर्षी एकूण महसुली जमेच्या (₹ 2,71,080.26 कोटी) 73 मुख्य शीर्षा अंतर्गत 3.24 टक्के (₹ 8,795.17) कोटी-800 इतर जमा शीर्षांतर्गत वर्गीकृत केले होते.

अशी प्रकरणे जेथे 50 टक्क्यांपेक्षा जास्त जमा गौण शीर्ष 800 –'इतर जमा' अंतर्गत वर्गीकृत केल्या आहेत, त्या **तक्ता 4.10** मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता 4.10: 2021-22 दरम्यान गौण शीर्ष 800 – इतर जमामध्ये नोंद केलेले महत्वपूर्ण जमा**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | मुख्य शीर्ष | विवरण | गौण शीर्ष 800 अंतर्गत जमा | एकूण जमा | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 0029 | जमीन महसूल | 2216.80 | 3064.66 | 72.33 |
| 2 | 0217 | शहरी विकास | 4936.01 | 5557.28 | 88.82 |
| 3 | 0070 | इतर प्रशासकीय सेवा | 305.60 | 320.54 | 95.33 |
| 4 | 0071 | पेंशन व अन्य सेवानिवृत्ती फायदे यांच्या बाबतीत अंशदान व वसुली | 153.93 | 204.64 | 75.22 |
| 5 | 0202 | शिक्षण, क्रिडा, कला आणि संस्कृती | 113.75 | 152.16 | 74.76 |
| 6 | 0216 | गृहनिर्माण | 112.83 | 117.11 | 96.34 |
| 7 | 0235 | सामाजिक सुरक्षा आणि कल्याण | 179.37 | 220.88 | 81.21 |
| 8 | 0220 | माहिती व प्रसिद्धी | 43.16 | 43.34 | 99.58 |
| 9 | 0250 | इतर सामाजिक सेवा | 198.19 | 279.31 | 70.96 |
| 10 | 0425 | सहकार | 92.38 | 103.64 | 89.13 |
| 11 | 0435 | अन्य कृषी योजना | 2.41 | 3.21 | 75.07 |
| स्त्रोत: वित्तीय लेखे 2021-22 | | | | | |

सर्वसमावेशक गौण शीर्ष 800 अंतर्गत मोठ्या रकमांच्या वर्गीकरणाचे वित्तीय अहवाल पारदर्शकतेवर परिणाम करतात आणि आवंटनात्मक प्राथमिकतेच्या योग्य विश्लेषणाचा विपर्यास होतो.

**मोजमाप संदर्भात समस्या**

## 4.9 मुख्य निलंबन आणि ऋण ठेव प्रेषण शीर्षांतर्गत प्रलंबित शिल्लक

शासनाचे हिशेब रोख आधारावर ठेवले जातात. शीर्ष जे "निलंबन शीर्ष" म्हणून ओळखले जाणारे काही आंतरिक/समायोजित लेखे शासकीय लेख्यांमध्ये उघडले जातात, ज्यामुळे जमा आणि भुगतानाचे व्यवहार प्रतिबिंबित होतात, परंतु कोषागार/अधिदान व लेखा कार्यालया द्वारे निराकरणाचे वेळापत्रक न पुरवणे, रिझर्व बँकेकडून निपटारा पत्राची अप्राप्ती, प्रमाणकांची अप्राप्ती इत्यादिंच्या माहिती अभावी लेख्यांच्या अंतिम शीर्षात नोंद केली जाऊ शकत नाही. हया लेख्यांचे शीर्ष उणे नावे अथवा उणे जमा देऊन अंतिमतः समायोजित केले जातात तेव्हा त्या अंतर्गतचे लेखे संबंधित अंतिम लेख्यांच्या शीर्षांतर्गत नोंद केले जातात. त्यानंतर जर हे लेखे समायोजित केले नाही तर निलंबन शीर्षांतर्गत शिल्लक जमा होईल आणि शासनाचे जमा आणि खर्च अचूकपणे प्रतिबिंबित होणार नाही. निलंबन व वित्त प्रेषण शीर्षांतर्गत शिल्लक **तक्ता 4.11** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.11: निलंबन व वित्त प्रेषण शीर्षांतर्गत शिल्लक**

**(₹ कोटी मध्ये)**

| गौण शीर्ष | 2019-20 | | 2020-21 | | 2021-22 | |
|---|---|---|---|---|---|---|
| मुख्य शीर्ष 8658-निलंबन | **खर्च** | **जमा** | **खर्च** | **जमा** | **खर्च** | **जमा** |
| 101–वेतन व लेखा अधिकारी निलंबन | 178.59 | 22.04 | 169.66 | 21.13 | 142.67 | 29.06 |
| निव्वळ | खर्च 156.55 | | खर्च 148.53 | | खर्च 113.61 | |
| 102 – निलंबन लेखे - नागरी | 9.78 | 5.62 | 34.18 | 4.31 | 4.26 | 5.14 |
| निव्वळ | खर्च 4.16 | | खर्च 29.87 | | जमा (-) 0.88 | |
| 107–रोख निराकरण निलंबन लेखे | 18.30 | 0.49 | 18.30 | 0.49 | 18.30 | 0.49 |
| निव्वळ | खर्च 17.81 | | खर्च 17.81 | | खर्च 17.81 | |
| 109–रिझर्व बँक निलंबन–मुख्यालय | (-)1.45 | 0.10 | (-)1.43 | 3.08 | 5.86 | 14.48 |
| निव्वळ | जमा 1.55 | | खर्च 4.51 | | जमा (-) 8.62 | |
| 110–रिझर्व बँक निलंबन – सीएओ | (-)2.00 | 2.85 | 440.00 | 371.42 | 43.71 | 3.03 |
| निव्वळ | जमा 4.85 | | खर्च 68.58 | | खर्च 40.68 | |
| 112 –निलंबन स्त्रोतावर कर कपात | 186.93 | 607.14 | (-)18.33 | 146.43 | 0 | 180.41 |
| निव्वळ | जमा 420.21 | | जमा 164.76 | | जमा (-) 180.41 | |
| 123–एआयएस अधिकाऱ्यांची गट विमा | 5.65 | 0.18 | 4.53 | 0.26 | 4.57 | 0.10 |

| गौण शीर्ष | 2019-20 | | 2020-21 | | 2021-22 | |
|---|---|---|---|---|---|---|
| योजना | | | | | | |
| निव्वळ | खर्च 5.47 | | खर्च 4.27 | | खर्च 4.47 | |
| मुख्य शीर्ष 8782 – वित्त प्रेषण | | | | | | |
| 102–सार्वजनिक बांधकाम प्रेषण | 155220.14 | 154822.30 | 184501.22 | 186208.92 | 226577.76 | 227677.03 |
| निव्वळ | खर्च 397.84 | | जमा 1707.70 | | जमा 1099.27 | |
| 103 –वन प्रेषण | 13934.22 | 13946.49 | 16394.16 | 16429.55 | 1935760.02 | 1940625.01 |
| निव्वळ | जमा 12.27 | | जमा 35.39 | | जमा 48.65 | |
| स्त्रोत: संबंधित वर्षाचे वित्त लेखे | | | | | | |

वित्त लेखे या शीर्षांतर्गत निव्वळ शिलकी दर्शवितात. प्रलंबित शिलकी नावे आणि जमा वेगवेगळे एकत्रित करून परिगणित केल्या जातात. या शीर्षांतर्गत असलेल्या शिलकींचे परिणाम पुढील परिच्छेदात उद्धृत करण्यात आले आहेत.

***वेतन व लेखा कार्यालय निलंबन***

हे शीर्ष महालेखाकार तसेच भारत सरकारचे विविध स्वतंत्र वेतन व लेखा अधिकाऱ्यांमधील व्यवहारांचा निपटारा करण्यासाठी निश्चित केले आहे. या शीर्षांतर्गत प्रथमतः महालेखाकारांच्या पुस्तकात नोंदविलेल्या व्यवहारांचा निपटारा, वेतन व लेखा कार्यालयातून धनादेश/मागणी धनाकर्ष प्राप्त झाल्यानंतर आणि वेतन आणि लेखा कार्यालयाच्या वतीने धनादेश आणि मागणी धनाकर्षाची रक्कम राज्याच्या खजिन्यातून जारी केल्यानंतर केला जातो. या शीर्षांतर्गत प्रलंबित नावे शिल्लक म्हणजे महालेखाकारांद्वारे वेतन व लेखा कार्यालयाच्या वतीने करण्यात आलेले भुगतान अद्यापही पुनर्प्राप्त करायचे आहे. प्रलंबित जमा शिल्लक म्हणजे वेतन व लेखा कार्यालयाच्या वतीने महालेखाकारांना प्राप्त झालेले भुगतान जे अद्याप द्यायचे आहे. या शीर्षांतर्गत निव्वळ नावे शिल्लक उतरता कल दर्शवितो. यांच्या निपटारा/निराकरणानंतर राज्य सरकारच्या रोख शिलकीत वाढ होईल. हे व्यवहार मुख्यतः राज्य शासनाने केंद्रीय नागरी निवृत्ती वेतन धारकांना केलेल्या भुगताना संदर्भात आहेत.

***स्त्रोतामधून कर वजा करून निलंबन***

हे शीर्ष आयकर कपातीद्वारे प्राप्ती इत्यादि जे स्त्रोतांमधून कर वजा करून केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाला धनादेशाद्वारे भुगतान करण्यासंबंधी आहे. ह्या शीर्षाखालील मागील वर्षांच्या संदर्भात निव्वळ जमा शिलकीत वाढ दर्शविली आहे. निपटारा/निराकरणानंतर राज्य शासनाच्या रोख शिलकीत वाढ होईल.

***सार्वजनिक बांधकाम प्रेषण***

2021-22 दरम्यान या शीर्षांतर्गत निव्वळ जमा शिलकीमध्ये निव्वळ वाढ होती. निपटारा/ निराकरण केल्यावर, राज्य शासनाच्या रोख शिलकीत वाढ होईल. हे प्रेषण सार्वजनिक बांधकाम विभागाने कोषागारात जमा केलेल्या धनादेशाशी संबंधित आहे.

***वन प्रेषण***

ह्या शीर्षांतर्गत मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ जमा शिलकीचा चढता कल दिसून आला. निपटारा/निराकरण केल्यानंतर शासनाची रोख शिल्लक कमी होईल. हे प्रेषण वन विभागाने पार्टींना जारी केलेल्या धनादेशाशी संबंधित आहे.

### 4.9.1 ऋण ठेवी प्रेषण शीर्षांतर्गत प्रतिकूल शिल्लक

प्रतिकूल शिलकी या त्या लेखा शीर्षात असणाऱ्या ऋणात्मक शिलकी आहेत, ज्या त्या लेखा शीर्षांतर्गत दिसतात, जेथे ऋणात्मक शिल्लक नसावी. उदाहरणार्थ, कोणत्याही कर्ज किंवा अग्रिम लेखा शीर्षांच्या तुलनेत, एक ऋणात्मक शिल्लक मूळ अग्रिम रकमेपेक्षा जास्त परतफेड दर्शविते.

31 मार्च 2022 रोजी, लेख्यात तीन प्रतिकूल शिलकीची प्रकरणे होती. ही प्रकरणे राज्य शासनाचे आंतरिक ऋण (मुख्य शीर्ष 6003) ₹ 92.97 कोटी, शिक्षण क्रीडा, कला व संस्कृती (मुख्य शीर्ष 6202) ₹ 0.44 कोटी कर्ज,पिक संवर्धन (मुख्य शीर्ष 6401) ₹ 0.77 कोटी, पशु संवर्धन (मुख्य शीर्ष) (6405) ₹ 0.25 कोटी आणि इतर कृषी कार्यक्रमांसाठी कर्ज (मुख्य शीर्ष 6435) ₹ 0.02 कोटीशी संबंधित आहेत. प्रतिकूल शिल्लक चुकीच्या वर्गीकरणामुळे होती जे पुनर्विलोकन/ दुरूस्ती साठी प्रलंबित आहे.

## 4.10 विभागीय आकड्यांचा ताळमेळ न करण्याबाबत

महसूल/खर्चावर प्रभावी अर्थसंकल्पीय नियंत्रण ठेवण्यासाठी आणि लेख्यांमध्ये अचूकता सुनिश्चित करण्यासाठी, सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी शासनाच्या महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, मुंबई किंवा महालेखाकार (लेखा व हकदारी)-II, नागपूर किंवा अधिदान आणि लेखा कार्यालय, मुंबई या कार्यालयांनी दिलेल्या आकडेवारीशी शासनाच्या प्राप्ती आणि खर्चाचे समायोजन करणे आवश्यक आहे.

हस्तांतरण प्रविष्टी आणि नियतकालिक समायोजनाद्वारे खर्चाचे समायोजन वगळता शासनाच्या एकूण खर्चाच्या (₹ 3,44,215.29 कोटी) तुलनेत केवळ ₹ 2,87,809.04 कोटी (83.61 टक्के) खर्चाचे समायोजन पूर्ण करण्यात आले. ग्रामीण विकास (98 टक्के); आदिवासी विभाग (97 टक्के); सार्वजनिक आरोग्य (97 टक्के) आणि गृहनिर्माण (95 टक्के) हे मुख्य कसूरवार विभाग आहेत.


नियंत्रण अधिकाऱ्यांची संख्या आणि मागील तीन वर्षात झालेल्या खर्चाच्या समायोजनाच्या व्याप्तीचे तपशील **तक्ता 4.12** मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता 4.12: खर्चाच्या समायोजनाची सद्यस्थिती**

| वर्ष | नियंत्रण अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण संख्या | पूर्ण ताळमेळ झालेले | अंशतः ताळमेळ झालेले | मुळीच ताळमेळ न झालेले |
| 2019-20 | 7150 | 6884 | 179 | 87 |
| 2020-21 | 7075 | 6393 | 281 | 401 |
| 2021-22 | 7040 | 6572 | 233 | 235 |
| स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाने संकलित केलेली माहिती | | | | |

**आलेख 4.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2021-22 दरम्यान हस्तातंरण प्रविष्टी व नियतकालिक समायोजन वगळता शासनाच्या एकूण जमेच्या (₹ 2,09,105.09 कोटी) तुलनेत केवळ ₹ 2,03,202.66 कोटी (97.18 टक्के) जमेचे समायोजन पूर्ण झाले आहे.

**आलेख 4.4: 2019-20 ते 2021-22 च्या समायोजनाची स्थिती**
**(₹ कोटी मध्ये)**




(स्त्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे)

## 4.11 रोख शिलकीचे समायोजन

प्रधान महालेखाकार (लेखा व हकादारी) ह्यांच्या पुस्तकाप्रमाणे असलेली राज्य सरकारची रोख शिल्लक आणि रिझर्व बँकेनी त्यांच्या अहवालात दर्शविलेली यात काहीही फरक नको. लेख्यानुसार आणि रिझर्व बँकेनुसार वर्ष 2021-22 करिता रोख शिलकीचा असमायोजित फरक **तक्ता 4.13** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 4.13: रोख शिलकीचा असमायोजित फरक**

**(₹ कोटी मध्ये)**

| महालेखाकारांच्या नोंदी प्रमाणे | रिझर्व बँकेच्या नोंदीनुसार | फरक |
|---|---|---|
| 134.14 (खर्च) | 822.92(खर्च) | 957.06(खर्च) |
| स्त्रोत: वित्त लेखे 2021-22 | | |

**प्रकटीकरणासंबंधी समस्या**

## 4.12 लेखा मानकांनुसार अनुपालन

संविधानाच्या अनुच्छेद 150 नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सल्यानुसार भारताचे राष्ट्रपती, संघ आणि राज्य शासनाच्या लेख्यांच्या प्रपत्राचा नमुना विहित करू शकतात. तसेच भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकांनी शासकीय लेखा आणि वित्तीय अहवालाच्या मानकांच्या सुत्रबद्धतेकरिता शासन लेखा मानके सल्लागार मंडळ (GASAB) 2002 मध्ये स्थापित केले, जेणे करून उत्तरदायित्व कार्यप्रणालीमध्ये वृद्धी होईल.भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या सल्यानुसार भारताच्या राष्ट्रपतींनी आतापर्यंत तीन भारतीय सरकारी लेखा मानके अधिसूचित केले आहेत.

खालील तीन भारतीय सरकारी लेखा मानके, वित्त मंत्रालय, भारत सरकारने अधिसूचना जारी केल्याच्या संबंधित तारखेपासून अनिवार्य करण्यात आले आहेत.

1. शासनाने दिलेल्या हमी –**भारतीय सरकारी लेखा मानक 1**
2. सहाय्य अनुदानाचे लेखांकन आणि वर्गीकरण-**भारतीय सरकारी लेखा मानक 2**
3. शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे - **भारतीय सरकारी लेखा मानक 3**

राज्य शासनाकडून संपूर्ण माहिती न मिळाल्यामुळे, भारतीय सरकारी लेखा मानकांच्या प्रकटीकरण आवश्यकतेचे अनुपालन **तक्ता 4.14** मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत पाळले गेले नाही.

**तक्ता 4.14: लेखा मानक तकत्यासोबत अनुपालन : लेखा मानकांचे अनुपालन**

| अनु क्र. | लेखा मानक | भारतीय सरकारी लेखा मानकाचे सार | राज्य शासनाचे अनुपालन | कमतरतेचा परिणाम |
|---|---|---|---|---|
| 1. | **भारतीय सरकारी लेखा मानक–1:** *शासनाने दिलेली हमी-प्रकटीकरण आवश्यकता* | वर्षाअखेर बेरीज, गाळलेले, आवाहन केलेले, मुक्त केलेले आणि थकबाकीसह शासनाने वर्षादरम्यान आर्थिक विवरण पत्रात दिलेल्या अधिकतम हमीची जास्तीत जास्त राशी उघड करण्याची आवश्यकता या मानकानुसार असते. | सरकार ज्या मर्यादेत हमी देऊ शकते, ती राज्य विधानमंडळाने निश्चित केलेली नाही | मर्यादा ठरविल्या नसल्यामुळे हमी नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, जर आवाहन केले तर भविष्यात दायित्व उत्पन्न होऊ शकते. |
| 2. | **भारतीय सरकारी लेखा मानक-2:** *लेखा आणि सहाय्य अनुदानाचे वर्गीकरण* | सहाय्य अनुदान हे अनुदानकर्त्याच्या लेख्यामध्ये महसुली खर्च म्हणून वर्गीकृत करायचे असते आणि अंतिम वापर लक्षात न घेता, अनुदानग्राहीच्या लेख्यांमध्ये महसुली जमा म्हणून वर्गीकृत करायचे असते. | वस्तूच्या स्वरूपात सहाय्य अनुदानाच्या तपशीलवार प्रकटीकरणावर शासनाकडून खुलासा प्राप्त झाला नाही. महाराष्ट्र शासनाने सहाय्य अनुदानासंबंधी खर्चाचे महसुली भागाऐवजी, भांडवली भागात चुकीचे वर्गीकरण केले. | संस्थानादिलेले ₹ 1,662.63 कोटीचे सहाय्य अनुदान महसुली शीर्षाच्या ऐवजी भांडवली शीर्षातर्गत वर्गीकरण केले. अनुपालन सादर न केल्याचा परिणाम महसुली तूट कमी दाखविण्यात झाला. |

| अनु क्र. | लेखा मानक | भारतीय सरकारी लेखा मानकाचे सार | राज्य शासनाचे अनुपालन | कमतरतेचा परिणाम |
|---|---|---|---|---|
| 3. | **भारतीय सरकारी लेखा मानक–3:** शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे | हे मानक परिपूर्ण, अचूक आणि एकसमान लेखापद्धती सुनिश्चित करण्यासाठी शासनाने वित्तीय विवरणपत्रकाद्वारे केलेल्या कर्जे आणि अग्रिमे संदर्भात मान्यता, मोजमाप, मूल्यांकन आणि अहवाल देण्यासंदर्भात आहे. | (वित्त लेख्याचे विवरणपत्र 7 आणि 18)चे अनुपालन सादर केले नाही. कर्ज घेणाऱ्या गटाकडून थकित रकमेची परतफेड, शाश्वत कर्ज, थकबाकीवरील व्याज देयके जर असेल तर, यावरील प्रकटीकरण संकलित केले नव्हते आणि पुरवले नव्हते. | व्याज आणि परतफेडीचे भुगतान न होण्याचा परिणाम महसूल आणि राजकोषीय तुटीवर होऊ शकतो. |

## 4.13 स्वायत्त संस्थेचे लेखे/स्वतंत्र लेखापरीक्षण प्रतिवेदनाचे सादरीकरण

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांची (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम 1971 च्या, अनुच्छेद 19(3) अनुसार राज्यपाल/प्रशासक, जनहितार्थ, संघशासित प्रदेश अथवा विधानमंडळाद्वारे केलेल्या कायद्याद्वारे स्थापित महामंडळांच्या लेख्यांची प्रकरण परत्वे लेखापरीक्षा करण्याची विनंती करू शकतात आणि जिथे अशी विनंती केल्या जाते, नियंत्रक व महालेखापरीक्षक अशा महामंडळांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करतील तसेच लेखापरीक्षण प्रयोजनाकरिता अशा महामंडळांची पुस्तके आणि लेखे प्राप्त करण्याचा अधिकार राहील.

अनुच्छेद 19 व्यतिरिक्त जेथे कोणत्याही संस्था अथवा प्राधिकरणाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, कायद्याने किंवा कायद्यांतर्गत नियंत्रक व महालेखापरीक्षकांना सोपविली नसेल आणि राष्ट्रपती, अथवा राज्याचे राज्यपाल अथवा विधानमंडळ असलेल्या संघशासित प्रदेशाच्या प्रशासकांनी प्रकरण परत्वे विनंती केली असेल तर अशा संस्था अथवा प्राधिकाऱ्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा अशा शर्ती आणि अटींवर करायची सहमती त्यांच्यामध्ये आणि संबंधित शासनासोबत झाली असेल तर लेखापरीक्षेच्या प्रयोजनाकरिता त्या संस्था अथवा प्राधिकाऱ्यांची पुस्तके आणि लेखे प्राप्त करण्याचा अधिकार असेल (अनुच्छेद 20).

उपरोक्त उल्लेखित स्वायत्त संस्था आणि प्राधिकाऱ्यांच्या प्रकरणांत लेखापरीक्षा प्रमाणपत्र जारी केले जाते, जेथे नियंत्रक व महालेखापरीक्षक एकमात्र लेखापरीक्षक म्हणून उपबंधित आहे. अशाप्रकारे या संस्था आणि प्राधिकाऱ्यांनी वार्षिक लेखे तयार करून लेखापरीक्षणासाठी महालेखाकारांकडे (लेखापरीक्षा) सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण प्रमाणपत्राव्यतिरिक्त, वित्तीय लेखापरीक्षा पूर्ण झाल्यावर लेखापरीक्षा कार्यालय स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल जारी करतात, जो लेख्यांच्या लेखापरीक्षण प्रमाणपत्राचा भाग असतो. हे स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमक्ष सादर करावे लागतात.

पर्यावरण, गृहनिर्माण, उद्योग, पाटबंधारे, नगर विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र शासनाने स्वायत्त संस्था स्थापन केल्या आहेत. नियंत्रक महालेखापरीक्षकांचे (कर्तव्ये, अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या अनुच्छेद 19 आणि 20 नुसार राज्यातील 26 स्वायत्त संस्थाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. स्वायत्त संस्थाद्वारे, लेखापरीक्षण सोपविण्याची स्थिती, लेखापरीक्षेला लेख्यांचे सादरीकरण, स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल जारी करणे तसेच त्यांचे विधानमंडळासमक्ष सादरीकरण **परिशिष्ट 4.3** मध्ये दर्शविलेले आहे.

जून 2022 मध्ये देय असलेल्या वर्ष 2021-22 साठीचे लेखेकोणत्याही स्वायत्त संस्थाकडून प्राप्त झाले नाहीत. स्वायत संस्थाच्या लेख्यांची थकबाकी **तक्ता 4.15** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.15: प्राधिकारी किंवा संस्थांच्या लेख्यांची थकबाकी**

| अनु क्र. | प्राधिकारी किंवा संस्थेचे नाव | केव्हापासून लेखे थकित | 2021-22 पर्यंत प्रलंबित लेखे |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) | 2021-22 | 1 |
| 2 | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ (MBOCWWB) | 2020-21 | 2 |
| 3 | महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (MAHA RERA) | 2021-22 | 1 |
| 4 | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (MERC) | 2020-21 | 2 |
| 5 | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) मुंबई | 2021-22 | 1 |
| 6 | महाराष्ट्र सागरी मंडळ (MMB), मुंबई | 2020-21 | 2 |
| 7 | राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग (RGSTC) | 2021-22 | 1 |
| 8 | मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA), मुंबई | 2021-22 | 1 |
| 9 | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, (MSKVIB), मुंबई | 2020-21 | 2 |
| 10 | महाराष्ट्र राज्य महिला आयोग (MSCW), मुंबई | 2020-21 | 2 |
| 11 | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) मुंबई | 2020-21 | 2 |
| 12 | तापी पाटबंधारे विकास महामंडळ (TIDC), जळगाव | 2020-21 | 2 |
| 13 | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (VIDC), नागपूर | 2020-21 | 2 |
| 14 | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (GMIDC), औरंगाबाद | 2020-21 | 2 |
| 15 | पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण (CAMPA) | 2019-20 | 3 |
| 16 | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (MKVDC), पुणे | 2020-21 | 2 |
| 17 | कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ (KIDC), ठाणे | 2020-21 | 2 |
| 18 | महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (MSHRC) | 2018-19 | 4 |
| 19 | महाराष्ट्र जल संवर्धन महामंडळ (MWCC), औरंगाबाद | 2018-19 | 4 |
| 20 | महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण (MSLSA), मुंबई | 2017-18 | 5 |
| 21 | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP), मुंबई | 2019-20 | 3 |
| 22 | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण(MWRRA) | 2017-18 | 5 |
| 23 | महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग (MSCPCR) | 2018-19 | 4 |
| 24 | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे आणि पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे | 2021-22 | 1 |
| 25 | महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग (MSMC) | 2016-17 | 6 |
| 26 | शुल्क नियामक प्राधिकरण | 2017-18 | 5 |

स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई व महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर क़डून प्राप्त माहिती

लेख्यांच्या सादरीकरणातील आणि त्याचा राज्य विधानमंडळाला प्रस्तुतीकरणात झालेल्या अमर्याद विलंबाचा परिणाम विधानमंडळाकडून ह्या संस्थांच्या कामकाजाची छाननी विलंबित झाली, जेथे शासकीय गुंतवणूक करण्यात आली.

## 4.14 विभागीय वाणिज्यिक उपक्रम/महामंडळे/कंपन्या

काही शासकीय विभागांचे विभागीय उपक्रम जे व्यावसायिक आणि अर्धव्यावसायिक प्रकारचे कार्यकलाप करतात त्यांना दरवर्षी विहित नमून्यात वित्तीय कार्यचालनाचे परिणाम दर्शविणारे प्रारूप लेखे तयार करावे लागतात, जे त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करू शकेल. पूर्णत्वास जाऊन विभागाने व्यवस्थापित केलेले लेखे व्यावसायिक आणि अर्धव्यावसायिक उपक्रम एकंदरीत वित्तीय आरोग्य आणि कार्यक्षमता प्रतिबिंबित करते. वेळेत पूर्ण न केलेल्या लेख्यांमुळे, शासनाची गुंतवणूक लेखापरीक्षण/राज्य विधानमंडळाच्या पुनरिक्षणाच्या बाहेर राहते. परिणामी, सुधारात्मक उपाय, जर काही, जबाबदारीची सुनिश्चितता आणि कार्यक्षमता वाढविण्यास करायची असल्यास, वेळेत घेतल्या जाऊ शकत नाही. याशिवाय, विलंबामुळे फसवणुकीची जोखिम आणि सार्वजनिक पैश्यांच्या गळतीचा धोका यामुळे प्रणाली असुरक्षित होते.

शासनाच्या विभाग प्रमुखांनी सुनिश्चित करावे की, उपक्रमांनी अशा प्रकारचे लेखे तयार केले आहेत आणि निर्दिष्ट वेळेच्या चौकटीत प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, कडे जसे प्रकरण असेल तसे सादर केले. मार्च 2022 रोजी 49 असे उपक्रम होते,ज्यापैकी कोणीही 2021-22 वर्षासाठी लेखे तयार केले नाही. पाच उपक्रमांच्या संदर्भात प्रोफार्मा लेख्यांच्या अंतिमीकरणाची मोठी प्रलंबितता आजारी एककांमुळे 24 ते 36 वर्षादरम्यान होती आणि कार्यरत नव्हती तसेच लेखे तयार करणे बंद केले होते. शासकीय दुग्ध योजना, वरळी 2008-09 पासून बंद झाली आहे. विभाग निहाय प्रोफार्मा लेखे बनविण्याच्या थकबाकीची स्थिती आणि शासनाची गुंतवणूक **परिशिष्ट 4.4** मध्ये दिली आहे.

## 4.15 संस्था आणि प्राधिकरणाला देण्यात आलेल्या अनुदानाचे/कर्जाचे तपशील सादर न करणे

नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या अनुच्छेद 14 च्या अंतर्गत, जेव्हा कोणत्याही संस्थेला किंवा प्राधिकाराला राज्याच्या संचित निधीतून अनुदान किंवा कर्जाद्वारे लक्षणीय वित्त पुरवठा केला आहे, नियंत्रक व महालेखापरीक्षक, संस्था किंवा प्राधिकरणास लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या अधीन, जसे प्रकरण असेल तसे, अशा सर्व संस्था आणि प्राधिकरणाच्या प्राप्ती आणि खर्चाचे लेखापरीक्षण करेल आणि त्यांनी लेखापरीक्षण केलेल्या प्राप्ती आणि खर्चाचा अहवाल देईल. नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 अनुच्छेद 15 अंतर्गत जेव्हा कोणतेही अनुदान अथवा कर्ज कोणत्याही

विशिष्ट हेतूसाठी दिले जाते, तेव्हा नियंत्रक व महालेखापरीक्षक त्या प्रक्रियेची छाननी करेल, ज्याद्वारे मंजुरी देणारा अधिकारी अटींच्या पूर्ततेबाबत स्वतःला संतुष्ट करतो.

संस्था/प्राधिकारी, ज्यांचे लेखापरीक्षण वरील विभागांतर्गत केले जाते आणि ज्या संस्थाना ₹ 25 लाख किंवा त्यापेक्षा अधिक आर्थिक सहाय्य देण्यात आले होते, कोणत्या उद्देशासाठी सहाय्य दिले गेले आणि संस्थांचा एकूण खर्च याची माहिती प्रत्येक वर्षी विभाग प्रमुखांनी लेखापरीक्षणाला सादर करणे आवश्यक आहे. वर्षभरात संस्थांना जारी केलेल्या अशा सहाय्याचा तपशील सरकारी विभागांकडून प्रतीक्षित होता (ऑक्टोबर 2022).

ऑक्टोबर 2022 पर्यंत 10,601 वार्षिक खात्यांच्या संदर्भात 2021-22 पर्यंत वार्षिक खात्यांची काल-निहाय थकबाकी **तक्ता 4.16** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 4.16: संस्थांकडून देय वार्षिक लेख्यांची काल-निहाय थकबाकी**

| वर्षांच्या संख्येत विलंब | लेख्यांची संख्या |
|---|---|
| 0-1 | 2875 |
| 1-3 | 2668 |
| 3-5 | 1087 |
| 5-7 | 636 |
| 7-9 | 821 |
| 9 आणि वरील | 2514 |
| **एकूण** | **10601** |
| स्त्रोत:प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर कडून प्राप्त माहिती | |

लेखे सादर करण्याची मुख्य प्रलंबितता उच्च आणि तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभागाची आहे.

विविध संस्थांना प्रदान केलेले अनुदान आणि कर्जाची माहिती सादर न करणे आणि त्यांच्याद्वारे लेखे प्रस्तुत न करणे यामुळे निधीच्या गैर वापराच्या जोखमीत वाढ होते म्हणून सुधारात्मक उपाय योजनेकरिता हे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

## 4.16 लेख्यांची कालबद्धता आणि गुणवत्ता

34 कोषागारे, 175 वन विभाग, 166 सार्वजनिक बांधकाम विभाग, 176 पाटबंधारे विभाग, एक आभासी कोषागार (ई-पावती लेखा), एक अधिदान आणि लेखा अधिकारी यांनी सादर केलेले प्रारंभिक लेखे आणि रिझर्व बँक ऑफ इंडियाचे ऍडव्हाइसेस यावरून प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी) राज्य सरकारचे लेखे तयार करतात.

वर्ष 2021-22 मध्ये एकही लेखा मासिक नागरी लेख्यातून वगळण्यात आला नाही.

## 4.17 दुर्विनियोजन, हानी, चोरी इत्यादि

मुंबई वित्त नियम, 1959 मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की दुर्विनियोजन, लबाडीचे आहरण/भुगतान किंवा अन्यथा कोषागार किंवा इतर कार्यालयात/विभागात

आढळल्यास संबंधित कार्यालयाने त्वरित निकटतम उच्च अधिकाऱ्यांना तसेच प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर यांना कळवावे.

मार्च 2022 पर्यंत ज्यावर अंतिम कारवाई प्रलंबित आहे अशी दुर्विनियोजन, अफरातफरी इत्यादि ₹ 2026.74 लाखांची 252 प्रकरणे राज्य शासनाद्वारे नोंदविली. संपूर्ण 252 प्रकरणांत प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यात आला. या परिशिष्टा मधून उद्भवलेल्या प्रत्येक प्रकरणात प्रलंबित प्रकरणांची रूपरेखा आणि प्रकरणांची संख्या याचा सारांश **परिशिष्ट 4.5** आणि **परिशिष्ट 4.6** मध्ये दिला आहे.

## 4.18 राज्य वित्त लेखापरीक्षा अहवालावरील कारवाईचा पाठपुरावा

2008-09 पासून राज्य वित्त लेखापरीक्षण अहवाल राज्य विधानमंडळास सादर केला जात आहे. राज्य लोकलेखा समितीने राज्य वित्त लेखापरीक्षण अहवाल 2016-17 चे प्रकरण-I वर चर्चा (मे 2019) केली आणि 37 शिफारशी (लोक लेखा समिती अहवाल क्र. 68) दिल्या. शिफारशीवरील कृती केलेल्या 19 टिप्पण्या प्राप्त आहेत. आमच्या लक्षात आले आहे की या शिफारशींच्या अंमलबजावणीद्वारे दुरूस्त करण्याची मागणी केलेल्या त्रुटी गेल्या अनेक वर्षापासून कायम आहेत आणि आमच्या अहवालात नोंदविल्या जात आहेत.

## 4.19 निष्कर्ष

- उपयोगिता प्रमाणपत्रांची प्रलंबित रक्कम 2020-21 मधील ₹ 42,861.97 कोटी वरून 2021-22 मध्ये ₹ 37,931.83 कोटी इतकी कमी झाली आहे. हे केवळ उद्दिष्टासाठी अनुदानाच्या वापरावरील खात्रीची अनुपस्थिती दर्शवित नाही तर विभागांद्वारे अनुदान देणाऱ्यांना जारी केलेल्या अनुदानाच्या वापरावर देखरेखीचा अभाव देखील दर्शविते.

- 2021-22 मध्ये 1330 संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे काढलेल्या ₹ 1,222.31 कोटी पैकी ₹ 929.02 कोटी 511 संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे (76 टक्के) मार्च 2022 मध्ये काढण्यात आले. संक्षिप्त आकस्मिक देयकाद्वारे मार्च महिन्यात लक्षणीय उचल दर्शविते की उचल ही मूलतः अर्थसंकल्पीय तरतूद संपविण्यासाठी केली गेली आणि अर्थसंकल्पावरील अपूरे नियंत्रण उघड करते.

- स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये मोठ्या रकमांचे साठवून ठेवणे विधानमंडळ आर्थिक नियंत्रण तत्वाच्या विरूद्ध आहे. या व्यतिरिक्त अकार्यक्षम स्वीय प्रपंजी लेख्यात लक्षणीय वाढ होती. अशा स्वीय प्रपंजी लेख्यातील अकार्यक्षम लेख्यांचे समायोजन न करणे आणि अशा लेख्यात पडून असलेली अखर्चित शिल्लक राज्याच्या संचित निधीत हस्तांतरित न करणे ह्यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय, फसवणूक आणि दुर्विनियोजनाचा धोका दर्शवितो.

- स्वायत्त संस्था/व्यावसायिक उपक्रमांच्या लेख्यांचे सादरीकरण/अंतिमीकरणात विलंब जबाबदारी शिथिलता आणि लेखे तयार करण्याचा उद्देश विफल करतो.

## 4.20 शिफारशी

(i) शासनाने विशिष्ट प्रयोजनाकरिता मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात विभागाद्वारे समयोचित उपयोगिता प्रमाणपत्रांच्या सादरीकरणाची खात्री करावी.

(ii) शासनाने आवश्यक नियमांतर्गत विनिर्दिष्ट कालावधीमध्ये संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या समायोजनाचा विचार करावा.

(iii) या वैयक्तिक खात्यांमध्ये अनावश्यकपणे पडलेल्या सर्व रकमा त्वरित संचित निधीमध्ये प्रेषित केल्या जातील याची खात्री करण्यासाठी वित्त विभागाने सर्व वैयक्तिक खात्यांचे पुनरावलोकन केले पाहिजे.